पशुसंगोपन

# यशस्वी दूध व्यवसायासाठी महत्त्वाची सूत्रे




प्रा.डॉ. श्रीकांत खुपसे

(मो.नं. ८६०५५३३३१५)

एम.जी.एम. नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय, गांधेली, छ. संभाजीनगर








दुधाळ जनावरांचे संगोपन ही संपूर्णपणे शास्त्रीय बाब आहे. जेव्हा जनावराच्या प्रकृतिमानात किंवा दूध उत्पादनात फरक पडतो, तेव्हा तो तुमच्या संगोपनाचाच दोष असतो हे ध्यानी घ्यावे. त्या दृष्टीने तुम्ही तुमचे व्यवसायविषयक ज्ञान वाढविले पाहिजे. यशस्वी दुग्ध व्यावसायिक होण्यासाठी आपल्या एकूण कार्यपध्दतीत आढळून आलेल्या किंवा तज्ञ मंडळींनी दाखवून दिलेल्या उणिवा दूर कराव्यात.

**नि**रोगी दुधाळ जनावरे आपले खाद्य नियमित खाऊन त्याचे रुपांतर दुधात करतात. दुग्ध व्यवसायात दूध हेच प्रमुख उत्पादन आहे. ते सातत्याने वाढत्या प्रमाणात यावयास पाहिजे तरच व्यवसाय योग्य मार्गाने चालला आहे असे म्हणता येईल. त्यासाठी जनावरांच्या खाण्यापिण्याच्या योग्य व्यवस्थेबरोबरच आणखी काही महत्त्वाच्या बाबी देखील लक्षात घेतल्या पाहिजेत. अशा बाबींचा उल्लेख येथे संक्षेपाने केला आहे.

१) आपल्या व्यवसायाची आखणी शास्त्रशुध्द पध्दतीने करावी. व्यवसायासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी गरजेपूर्वीच हाती येतील अशा पध्दतीने नियोजन असावे. आपल्याकडे खुराक, वैरण व काही नियमित लागणारी औषधे यांचा आवश्यक साठा कायम असावा. रोजच्या कामाचीही आखणी शिस्तशीरपणे केलेली असावी.

२) चरण्यासाठी गायी बाहेर सोडल्यावर रोजच्या रोज गोठा स्वच्छ झाडून शेण, मूत्र, कचरा इत्यादी काढून ते सारे खड्ड्यात नेऊन टाकावे. गोठा फरशीचा असेल तर दूध काढून जनावरे चरावयास सोडल्यावर तो स्वच्छ धुऊन घ्यावा. धुतल्यानंतर १० लिटर पाण्यात १० मि.लि. फिनाईल टाकून ते पाणी फरशीवर शिंपडावे; परंतु गोठा मातीचा असेल तर जमीन स्वच्छ केल्यानंतर त्या जमिनीवर ५ टक्के लिंडेन पावडर धुरळावी. अशा कामासाठी एखादे पुरेशा आकाराचे डस्टर आपल्या संग्रही कायमचे असावे. ८-१५ दिवसांतून एकदा गोठ्याच्या भिंतीवरही मॅलेथिऑन औषधी फवारुन घ्यावी. म्हणजे तेथे बसलेल्या पिसवा, गोचिड, ढेकूण यांचा नाश होईल. हे कीटकनाशक जनावरांना व माणसांना तुलनेने कमी अपायकारक आहे. तेव्हा त्याचाच वापर करावा.

३) गायींना दिवसातून एकदा (साधारणत: सकाळी ११-१२ वाजेदरम्यान) धुऊन घ्यावे. रोज सायंकाळी त्यांना खरारा करावा. गोचिड, पिसवा इत्यादींच्या प्रतिबंधासाठी ४-८ दिवसांनी जनावरांच्या अंगावर ५ टक्के कार्बारिल पावडर शक्यतो संध्याकाळी दूध काढल्यानंतर धुरळावी. दोन-तीन महिन्यांतून एकदा तरी आपल्या जनावराला जंतनाशक औषध द्यावे.

४) दररोज १० लिटरपेक्षा अधिक दूध देणाऱ्या गायीची धार दिवसातून तीन वेळा (सकाळ, दुपार व संध्याकाळ) काढावी. म्हणजे संकरित जनावरांना नेहमी होणारे कासेचे रोग आपल्या गायींना सहसा होणार नाहीत.

५) कळपाचे आरोग्य सतत उत्तम राहील याकडे जागरुकतेने लक्ष पुरवावे. दरवर्षी हंगामानुसार उद्भवणाऱ्या रोगाच्या साथी येण्यापूर्वीच त्या त्या रोगाच्या प्रतिबंधक लसी जनावरांना न चुकता टोचून घ्याव्यात.

अनुवांशिकदृष्ट्या दोषपूर्ण, खुरटी, कमजोर प्रकृतीची, रोगाला चटकन बळी पडणारी, कमी उत्पादन देणारी जनावरे शक्य तितक्या लवकर कळपातून काढून टाकावीत.

६) दुधाचे उत्पादन कायम वाढते ठेवण्यासाठी आपल्या गोठ्यातील २/३ पेक्षा अधिक जनावरे तरुण असली पाहिजेत. त्यासाठी नवीन कालवडी येताच जुन्या, अल्प उत्पादक किंवा फार वय झालेल्या गायी दरवर्षी विकून टाकाव्यात.

७) सर्व जनावरांची नंबर किंवा नावानुसार नोंद ठेवावी. त्यात कालवडीचा जन्म, तिच्या वंशावळीची माहिती, कालवडीची झालेली वाढ, तिचे पहिले वेत, प्रत्येक वेतात तिने दिलेले दूध यांची नोंद ठेवणे हिताचे ठरते.

८) संकरित जनावरे सार्वजनिक गायरानावर कधीही नेऊ नयेत. कारण आपल्या देशात जनावरांचे संगोपन अद्याप नीट केले जात नाही. त्यामुळे अनेक रोगग्रस्त जनावरे तेथे चरत असतात आणि ती आपल्या जनावरांत मिसळल्याने त्यांच्या रोगांचा प्रादुर्भाव आपल्या गुरांना होऊ शकतो. आपल्या गुरांसाठी स्वत:चे चराई रान तयार करावे. त्या रानात उत्तम व कसदार जातीच्या गवताची लागवड करावी. गवत सुमारे वीतभर वाढल्यावर किंवा फुलावर आल्यावर तेथे आपली जनावरे चरावयास सोडावीत. ही चराईसुध्दा सरसकट रानाच्या सर्व भागात एकदम करु नये. रानाचे प्लॉट पाडावेत व एकेका प्लॉटमध्ये काही दिवस गुरे चारत पुढे पुढे जावे. म्हणजे गवताची नासाडी न होता ते बरेच दिवस पुरेल.

९) 'ब्रुसेल्लोसिस' या रोगाने एखाद्या जनावराचा गर्भपात रानात झाला असेल तर अशा रानात आपली जनावरे अजिबात सोडू नयेत कारण हा रोग सांसर्गिक असून, तो फार भयंकर आणि अतिशय नुकसानकारक आहे.

१०) पशुवैद्यकांशी नियमित संपर्क असावा कारण त्यांची नेहमीच गरज लागते.

दुधाळ जनावरांचे संगोपन ही संपूर्णपणे शास्त्रीय बाब आहे. जेव्हा जनावराच्या प्रकृतिमानात किंवा दूध उत्पादनात फरक पडतो, तेव्हा तो तुमच्या संगोपनाचाच दोष असतो हे ध्यानी घ्यावे. त्या दृष्टीने तुम्ही तुमचे व्यवसायविषयक ज्ञान वाढविले पाहिजे. यशस्वी दुग्ध व्यावसायिक होण्यासाठी आपल्या एकूण कार्यपध्दतीत आढळून आलेल्या किंवा तज्ञ मंडळींनी दाखवून दिलेल्या उणिवा दूर कराव्यात. ■